# वर्तमानाचा आलेख चितारणारी कविता : 'वर्तमानातल्या कविता'

**डॉ.पदमाकर डिगांबर वानखडे**
(सहयोगी प्राध्यापक)
नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रम्हपुरी
भ्रमणध्वनी- ९९७५१९०५३९
इमेल- padmakarvishu@gmail.com

---

**प्रस्तावना** :

नवोदित कवी राम वासेकर यांचा 'वर्तमानातल्या कविता' हा काव्यसंग्रह असून यात वर्तमान परिस्थितीशी निगडित 41 कवितांचा समावेश झाला आहे. कवी हे स्वतः ग्रामीण भागात राहत असल्याने ग्रामजीवनाशी, तत्त्वाशी त्यांची नाळ जोडलेली आहे. आजचे वर्तमान, राजकारण, समाजकारण जागतिकीकरणाने व्यापलेले आहे. समाजकारणाच्या नावावर राजकारण होऊन वर्तमानकाळ अस्वस्थ झाला आहे. सामान्य माणसाचे जिने काळवंडून गेले आहे. हाच विषय कवीच्या कवितेचा असून समकालीन कवितेत 'वर्तमानातल्या कविता' या राम वासेकर यांच्या काव्यसंग्रहाने नवे तेज बहाल केले आहे.

**बिजशब्द :** कृषिप्रधान, सामाजिक, राजकीय, ग्रामजीवन, जागतिकीकरण, समकालीन इत्यादी.

**विषयविवेचन :**

भारत हा कृषिप्रधान देश असून सर्व व्यवसाय कृषीक्षेत्राशी संबंधित आहे. शेतकऱ्याला 'जगाचा पोशिंदा' म्हणतात. मात्र हाच पोशिंदा आज उपाशी मरत आहे. दिवसेंदिवस शेतकरी आत्महत्या करण्याचे सत्र सतत वाढत आहे. याबाबत कवी राम वासेकर आपल्या 'वर्तमान' या पहिल्याच कवितेत म्हणतात.

शेतकऱ्यांच्या भल्याचे
कागदी घोषणाच दिसे
जगाचा पोशिंदा
नाहक जीवन संपवतो कसे? (पृष्ठ क्र.1)

सरकारी कागदपत्रात शेतकऱ्याचे भले होत आहे, असे दर्शविले जाते. मात्र प्रत्यक्षातील त्याचे जिने मात्र अत्यंत खडतर असे बनले आहे. तो स्वतः राबराब राबून अन्न पिकवतो मात्र त्यालाच अन्नावाचून, पैश्यावाचून मरावे लागत आहे. कुटुंबातील सर्वांचे ओझे वाहत असताना त्याचा खांदा पूर्णपणे झुकून जातो. मात्र त्याची कदर कोणीही करत नाही. याबाबत सांगताना, शेतकऱ्याची दयनीय परिस्थिती व्यक्त करताना कवी म्हणतात,

पिकते तेव्हा विकत नाय
विकते तेव्हा पिकत नाय
सारं तसं दुष्टचक्र



Research Hub International Journal

सदानकदा तुझ्यावर वक्र (पृ.क्र.33)

असा दृष्टचक्रात अडकलेला शेतकरी येथे दिसतो. तो सारखा प्रयत्नशील असतो मात्र येणारा पाऊस वेळेवर न आल्याने त्याच्या पिकाची विल्हेवाट लागते. त्यांने मनोमन निर्माण केलेले दरवर्षीचे गणित विस्कटून जाते.

शेतीचं गणित करता करता
आयुष्याची माती झाली
दिवस रात्र खपून सुद्धा
मुद्दल हाती नाही आली. (शेतीचं गणित, पृ.क्र.45)

शेतकऱ्यांनी शेतीसाठी लावलेला खर्च पण निघत नाही. शेतीच्या गणितात त्याला नेहमी तोटा सहन करावा लागतो. त्याला शेताच्या कामात त्याची बायको मुलं हातभार लावतात. शेतकरी आपल्या मुलाला शिकविण्यासाठी अतोनात प्रयत्न करतो. त्याला उच्चशिक्षण देण्यासाठी स्वतः खस्ता खातो, मात्र एवढे करून ही त्याचा मुलगा नोकरीसाठी पात्र असून सुद्धा डोनेशन न देऊ शकल्याने संस्थाचालक त्याला मुलाखतीतून बाजूला सारतो. याबाबत वास्तव चित्रीत करताना कवी 'क्रांती करून जाय' या कवितेत म्हणतात,

डोनेशनचा कहर
भारी हाय
लाखांशिवाय गोष्ट, नाही तर
घरी बसून राय. (पृ.क्र.10)

अशाप्रकारे शेतकरी कुटुंबाची शेतीच्या बाबतीत तर त्याच्या मुलाची शिक्षणाच्या बाबतीत दुरावस्था होताना दिसते. आधुनिक खाजगीकरणाच्या संस्कृतीत शेतकऱ्याचे जीवन अधिकच उद्ध्वस्त होऊन या नव्या अर्थकारणात गावाकडच्या शेतकरी अजूनच नागवला जात आहे. आजची लोकशाही 'नोटशाही' झाली आहे. एकीकडे कंपन्यांची नफेखोरी आणि दुसरीकडे भ्रष्ट नोकरशाही अशा कात्रीत तो सापडला आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता ही लोकशाहीतील त्रितत्वे घटनेतच अडकून पडले आहेत. येथे प्रत्येकाला, व्यक्तीनुसार न्याय वेगवेगळा आहे. त्याचबरोबर सामान्य मनुष्य तर न्यायाच्या प्रतीक्षेतच आहे. नखावर मतदानाचे वेळी लावलेली शाईपुरती लोकशाही अस्तित्वात असल्याचे दुःख कवी व्यक्त करतात.

पैसा संपत्ती सत्ता अन बळाच्या
जोरावर चालवलेली झोटिंगशाही
नखावर मतदानाच्या वेळी शाई
तेवढीच नावापुरती लोकशाही. (लोकशाही पृ.क्र.4)

अशाप्रकारे सामान्य माणसाचे भकास जिने येथे व्यक्त झाले आहे. शेतकऱ्याच्या जीवनाचे, त्याच्या आजूबाजूला घडत असलेल्या राजकारणाचे वेगवेगळे पदर कवीने उलगडून दाखविले आहे. शेतकरी वर्गाने आता पेटून उठायला हवं, त्याचबरोबर जुन्या वाटांना नकार देऊन आपल्या जीवनाची नवीन वाट शोधायला हवी, अशी आशा कवीने 'आता पेटून उठायला हवं' या कवितेत व्यक्त केली आहे. शंभर दिवस किड्या-मुंग्यांसारखे

जगण्यापेक्षा एक दिवस सिंहासारखं जगावं, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. जर अशी क्रांती झाली नाही तर माणसाचं जगणं दुर्बल जनावरांनप्रमाणे होईल. त्यांच्यासारखं कुठेही मरून पळावे लागेल, असे त्यांनी आपल्या कवितेत म्हटले आहे. येथे अस्वस्थ वर्तमानाची विविध रूपे येथे सांगून वर्तमान बदलवण्याची हाक कवीने आपल्या कवितेत दिली आहे. वर्तमानात हतबल अगतिक हताश होऊन जगण्यापेक्षा या विदारक वास्तव्याविरुद्ध संघर्ष प्रवाहीत होण्याची प्रेरणा कवीच्या शब्दात आहे. त्यांची ‘नक्षलवाद’ ही कविता मर्ढेकरांच्या कवितेसारखी भासते. कदाचित मर्ढेकरी काव्यवाचनाचा प्रभाव कवीवर असल्याचे जाणवते, ते खालील कवितेत स्पष्ट जाणवते.

आज नक्षलवाद
राज्यकर्त्यांचे हस्तक
भांडवलदारांचे दस्तक
विचारांची कोरडी पुस्तक
विध्वंसाचा आगडोंब
माणसांचा कर्दनकाळ (पृष्ठ क्र. 28)

आज दहशतवाद दिवसेंदिवस सर्वत्र फोफावत आहे. याला राज्यकर्तेच कारणीभूत आहे. सामान्य माणसासाठी दहशतवाद कर्दनकाळ ठरत आहे, असे दिसून येते. कवी राम वासेकर यांची कविता अस्सल ग्रामीण असल्याचे दिसते. त्यात आलंकारिकता नसेल मात्र जीवनातील वास्तवता मात्र आहे. ते आपल्या कवितेविषयीची भूमिका स्पष्ट करताना आपल्या मनोगतामध्ये म्हणतात, "वर्तमानातील वास्तव अधोरेखित करताना स्वप्नाचे मोरोपंख ओबड-ढोबळ असले तरी अस्सल जीवन जाणीव व्यक्त करणाऱ्या निश्चितच आहेत." असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले आहे. आज माणसातील माणुसकी नावापुरती उरलेली आहे. भाऊ भावाचा वैरी बनला आहे. आत्महत्या,जिव्हाळा,आपुलकी,प्रामाणिकपणा,प्रेम ही मूल्ये दिवसेंदिवस नजरेआड जात आहे. ते आपल्या ‘माणसे’ या कवितेत म्हणतात,

लाचार अगतिक, बेशरम
झालेली माणसं
मूल्य तत्व विसरून
सोयीनुसार वागणारी माणसं. (पृष्ठ क्र.5)

श्रेष्ठ कनिष्ठ असे भेदभाव करणारी पैसा संपत्ती सत्तेसाठी आसुसलेली व नातं, संस्कार व आचार विसरलेली माणसं त्यांना नको आहेत. ती माणसं नसून शेतात लागलेले कणूस आहे. सोयीनुसार वागून आपला स्वार्थ साधणारी माणसं समाजाला घातक असल्याची त्यांच्या कवितेत व्यक्त होते.

अशाप्रकारे राम वासेकर यांच्या ‘वर्तमानातल्या कविता’ हा काव्यसंग्रह म्हणजे समकालीन जीवन वास्तव्याच्या धगधगता आलेख असल्याचे जाणवते. त्यांच्या काव्यात शेतकऱ्याची व्यथा वाढती महागाई, शिक्षणाचा बाजार, माणसाची अगतिकता,त्याची मनोवृत्ती, सध्यस्थितीतील लोकशाहीची असफलता प्रामुख्याने व्यक्त होते. एकूण त्यांच्या काव्यात वर्तमानस्थितीचे परिपूर्ण चित्र आल्याचे आपणास म्हणता येईल. समकालीन मराठी ग्रामीण कवी उत्तम कोळगावकर, नारायण सुमंत, इंद्रजीत भालेराव, प्रकाश होळकर, श्रीकांत देशमुख, गणेश

Research Hub International Journal

देशमुख यांच्या कवितेचा पदर हाती घेऊन नवोदित कवी राम वासेकर यांची कविता पुढे सरकत असल्याचे दिसते. एकूणच त्यांचा वर्तमानातल्या कविता आजच्या वर्तमानस्थितीचे परिपूर्ण चित्र असल्याचे म्हणता येईल.

**निष्कर्ष :**

1. कवी राम वासेकर यांच्या कवितेत आजच्या वर्तमानस्थितीचे परिपूर्ण चित्र आल्याचे म्हणता येईल.
2. वर्तमानात हतबल अगतिक हताश होऊन जगण्यापेक्षा या विदारक वास्तव्याविरुद्ध संघर्ष प्रवाहीत होण्याची प्रेरणा कवीच्या शब्दात आहे.
3. आधुनिक खाजगीकरणाच्या संस्कृतीत शेतकऱ्याचे जीवन अधिकच उद्ध्वस्त झाल्याचे कवीने आपल्या कवितेत स्पष्ट केले आहे.
4. आजचे राजकारण समाजकारण न राहता स्वार्थाने बर्बटल्याचे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ :**


- समकालीन मराठी कविता : एक निरीक्षण - प्रकाश देशपांडे केजकर स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, प्र.आ. 2013
- ‘वर्तमानातल्या कविता’ (काव्यसंग्रह) - कवी राम वासेकर, राघव पब्लिशर्स अँड डिस्ट्रीब्युटर्स नागपूर 32, प्र.आ. 2013


Research Hub International Journal